# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 06 November 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०६ नोव्हेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रसिद्ध लोकगीत गायिका शारदा सिन्हा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. शारदा सिन्हा यांची मैथिली आणि भोजपुरी लोकगीते गेल्या अनेक दशकांपासून खूप लोकप्रिय आहेत, असं पंतप्रधान म्हणाले. श्रद्धेचे महान पर्व असणाऱ्या छठ या सणाशी संबंधित त्यांची सुमधुर गाणी नेहमीच स्मरणात राहतील, असं पंतप्रधानांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. दरम्यान, शारदा सिन्हा यांच्या पार्थिव देहावर उद्या पाटणा इथं अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची शनिवारी ९ तारखेला नांदेड इथं जाहीर सभा होणार आहे. खासदार अशोक चव्हाण तसंच खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी ही माहिती दिली. जिल्ह्यातल्या महायुतीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ ही सभा होणार असल्याचं चव्हाण यांनी सांगितलं. तत्पुर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी अकोला इथं सभा घेणार आहेत.

****

केंद्रीय निवडणूक आयोगाची आज छत्रपती संभाजीनगर इथं जिल्ह्याच्या निवडणूक प्रक्रियेची आढावा बैठक सुरू आहे. छत्रपती संभाजीनगरसह नागपूर, अमरावती विभागाचाही आढावा यावेळी घेण्यात येणार आहे. या बैठकीला निवडणूक आयोगाचे उप आयुक्त हिर्देश कुमार, मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम तसंच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित आहेत.

****

लातूर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक विषयक खर्चाच्या नोंदवहीची निवडणूक खर्च निरीक्षकांकडून तीन वेळा तपासणी

केली जाणार आहे. पहिली तपासणी उदगीर विधानसभा मतदारसंघ ७ तारखेला, अहमदपूर, निलंगा विधानसभा मतदारसंघातील ८ तारखेला, तसंच लातूर ग्रामीण, लातूर शहर आणि औसा विधानसभा मतदारसंघातील निवडणूक खर्च तपासणी ९ तारखेला रोजी होणार आहे. त्यानंतर दुसरी तपासणी १२ आणि १३ तसंच तिसरी तपासणी १६ आणि १७ तारखेला होणार आहे.

****

नाशिक जिल्ह्यातल्या शिवडी विधानसभा मतदारसंघात मनसे नेते बाळा नांदगावकर यांना समर्थन देण्याची घोषणा मुंबई भाजपचे अध्यक्ष आमदार विधिज्ञ आशिष शेलार यांनी काल केली. शिवडी इथं काल झालेल्या मेळाव्यात ते बोलत होते.

****

विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसचा जाहीरनामा आज प्रसिद्ध होणार आहे. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांच्या हस्ते मुंबईत वांद्रे कुर्ला संकुलात त्याचं प्रकाशन होईल. त्यानंतर महाविकास आघाडीच्या महाराष्ट्र स्वाभिमान सभेलाही ते संबोधित करतील. या सभेला ज्येष्ठ नेते शरद पवार, उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यांच्यासह महाविकास आघाडीतले प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. तत्पूर्वी राहुल गांधी आज दुपारी नागपुरात ‘संविधान सन्मान संमेलनाला’ उपस्थित राहणार आहेत.

****

मराठी रंगभूमी दिनाच्या औचित्याने, अखिल महाराष्ट्र विद्यामंदिर समितीच्या वतीनं दिलं जाणारं विष्णुदास भावे गौरव पदक ज्येष्ठ रंगकर्मी सुहास जोशी यांना काल सांगली इथं झालेल्या कार्यक्रमात प्रदान करण्यात आलं. शंभराव्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष डॉक्टर जब्बार पटेल यांच्या हस्ते सुहास जोशी यांना सन्मानित करण्यात आलं. विष्णुदास भावे गौरव पदक, पंचवीस हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि शाल असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. अखिल महाराष्ट्र नाट्य विद्या मंदिर समितीचे अध्यक्ष डॉक्टर शरद कराळे आणि आगामी मराठी साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्ष डॉक्टर तारा भवाळकर यावेळी उपस्थित होत्या.

****

इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदा राज कपूर, तपन सिन्हा, अक्किनेनी नागेश्वर राव आणि मोहम्मद रफी यांचे चित्रपट दाखवण्यात येणार आहेत. यात राज कपूर यांचा आवारा, तपन सिन्हा दिग्दर्शित हार्मोनियम, अक्किनेनी

नागेश्वर राव यांचा देवदासू या चित्रपटांचा समावेश आहे. मोहम्मद रफी यांनी गायलेली गीतं समाविष्ट असलेला हम दोनो हा चित्रपट देखील यावेळी दाखवला जाईल. तसंच, या कलाकारांच्या आठवणींचं प्रदर्शनही या महोत्सवात भरवण्यात येणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं १४ वर्षांखालील राष्ट्रीय टेनिस स्पर्धा सुरु आहेत. काल झालेल्या सामन्यांत महाराष्ट्राच्या स्मित उंद्रे, आरव मुळ्ये यांनी मानांकित खेळाडूंवर मात करत पुढच्या फेरीत प्रवेश केला. स्मित उंद्रेनं गुजरातच्या १४ व्या मानांकित कबीर परमारचा पराभव केला. तर, आरव मुळ्येनं तेलंगणाच्या चौथ्या मानांकित प्रणित रेड्डीवर विजय मिळवला. मुलींच्या गटात दुसऱ्या फेरीत अव्वल मानांकित राजस्थानच्या आराध्या मीना हिनं ओडिशाच्या शजफाचा पराभव केला.

****

आंतरराष्ट्रीय क्रिकेट नियामक मंडळ –आयसीसीच्या काल जाहीर करण्यात आलेल्या गोलंदाजांच्या क्रमवारीत भारताची महिला क्रिकेट खेळाडू दीप्ती शर्मा दूसऱ्या स्थानावर असून अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत ती चौथ्या स्थानावर आहे. इंग्लंडची सोफी एक्लेस्टोन ही पहिल्या स्थानावर आहे.

****